‘ प्रेस नोट ’

दिनांक १२/०२/२०२५

| युनिट | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती, |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री.धनंजय अरविंदराव भटकर वय ४७ वर्ष, व्यवसाय— नोकरी पद—वनपाल, क्षेत्र सहायक शेकदरी सर्कल कार्यालय शहापुर ता. वरुड जि.अमरावती वर्ग--३ रा.एकविरा विदयुत कॉलनी,दत्त मंदीर जवळ अमरावती ता.जि.अमरावती |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ४,९५०/— रु. |
| तडजोडी अंती स्विकारण्याचे मान्य केलेली लाचेची रक्कम | ४,५००/— रु. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ४,५००/— रु. |
| घटनास्थळ | क्षेत्र सहायक शेकदरी सर्कल कार्यालय, वनविभाग शहापुर ता. वरुड जि.अमरावती |
| घटना ता. व वेळ | दि. १२/०२/२०२५ चे १२.२७ ते १२.५८ वा. चे सुमारास. |

**थोडक्यात हकीकत :—** यातील तक्रारदार हे सागवान खरेदी—विक्रीचा व्यवसाय करीत असुन.त्यांनी मौजा जरुड भाग—२ गट क्रमांक १११८ चे शेतमालक यांचेसोबत त्यांच्या शेतातील ३३ सागवान झाडे विकत घेण्याबाबतचा व्यवहार केलेला आहे.शेतमालकाच्या संमतीने वनविभागामार्फत झाडे तोडण्याची परवानगी घेणे, लॉगींग पंचनामा करुन घेणेकरीता अर्ज करणे,तसेच वाहतुक परवाना मिळण्याकरीता पाठपुरावा करणेकरीता तक्रारदार हे स्वतः क्षेत्र सहायक शेकदरी सर्कल कार्यालय शहापुर ता.वरुड जि.अमरावती येथील कार्यालयात गेले असता लोकसेवक श्री.धनंजय अरविंदराव भटकर पद—वनपाल,कार्यालय—क्षेत्र सहायक शेकदरी सर्कल कार्यालय शहापुर ता.वरुड जि.अमरावती यांना एक आठवडयापुर्वी भेटले असता त्यांनी तक्रारदार यांना **सदर ३३ झाडांचा लॉगींग पंचनामा करुन वाहतुक परवाना मिळण्याकरीता प्रकरण वरीष्ठ कार्यालयात पाठविण्याकरीता प्रती झाड १५०/— रू. प्रमाणे एकुण ४,९५०/— रु. लाचेची मागणी करत आहेत** अशी लेखी तक्रार दिली. नमुद तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ११.०२.२०२५ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान आलोसे यांनी **सदर ३३ झाडांचा लॉगींग पंचनामा करुन वाहतुक परवाना मिळण्याकरीता प्रकरण वरीष्ठ कार्यालयात पाठविण्याकरीता प्रती झाड १५०/— रू. प्रमाणे एकुण ४,९५०/— रु.** तडजोडीअंती पंचासमक्ष ४,५००/— रु. लाचेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविली.

दिनांक १२.०२.२०२५ रोजी आयोजित सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे श्री.धनंजय अरविंदराव भटकर, वय ४७ वर्ष, व्यवसाय— नोकरी, पद—वनपाल, क्षेत्र सहायक शेकदरी सर्कल कार्यालय शहापुर ता.वरुड जि.अमरावती वर्ग—३ रा.एकविरा विदयुत कॉलनी, दत्तमंदीर जवळ अमरावती ता..अमरावती जि. अमरावती यांनी तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष ४५००/—रुपये स्विकारली वरुन आलोसे श्री.धनंजय अरविंदराव भटकर, वय ४७ वर्ष, व्यवसाय— नोकरी पद—वनपाल यांना ताब्यात घेण्यात आले असुन आरोपीविरुदध पो.स्टे. वरुड येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरू आहे.

सदरची कार्यवाही अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती, परिक्षेत्र अमरावती चे मा.पोलीस अधीक्षक, श्री. मारुती जगताप, अपर पोलीस अधीक्षक, श्री.सचिन्द्र शिंदे, पोलीस उपअधिक्षक श्री.मंगेश मोहोड, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरिक्षक, चित्रा मेसरे, पोलीस निरीक्षक, श्री.केतन मांजरे, पोलीस कर्मचारी, पो.शि शैलेश कडु, पो.शि.वैभव जायले, चालक पो.हवा चंद्रकांत जनबंधु यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागातर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकीय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ अॅन्टी करप्शन ब्युरो अमरावती विभागाशी संपर्क साधावा.

**सपंर्क —** अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती. ललील सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती.
**टोल फ्री कमांक —** १०६४, दुरध्वनी कमांक ०७२१— २५५२३५५, २५५३०५५

पोलीस उप-अधीक्षक कार्यालय अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
सत्यमेव जयते

(चित्रा मेसरे )
पोलीस निरीक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती.